## नि.मु.क्र.२६५/२००९
## शिवाजी रावसाहेब कुंभार वि. प्रल्हाद रावसाहेब कुंभार व १.
## निशाणी १८८ चे अर्जावरील आदेश
## (आदेश दि.०७.०३.२०१७)

०१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांचेतर्फे दाव्यात दुरूस्ती करणेकामी दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ अन्वये अर्जात नमूद कारणांवरून दाखल केलेला आहे. सदरचेच अर्जावर प्रतिवादी यांचे तर्फे म्हणणे देवून अर्ज मंजूर करण्यास सक्त रित्या हरकती उपस्थिती करण्यात आलेल्या आहेत.

०२. अर्ज व त्यावरील म्हणणे पाहिले. दोन्ही बाजूच्या विद्वान विधीतज्ज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादी विधीज्ञांनी त्यांचे युक्तिवादाचे समर्थनार्थ **कृष्णाजी शंकर मोघे वि. सिताराम गंगाधर शेंडे**, २००३ (१) एम. एच. एल. जे. २३३ या मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायनिवाडयाचा, **मुद्रा सॉल्ट ॲन्ड केमिकल इंडस्ट्रीज वि. कलेक्टर ठाणे आणि इतर,** २००१ (३) एम. एच. एल. जे. १५१ या मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायनिवाडयाचा, **सुरिंदर सिंग वि. कपूर सिंग,** २००५ (३) एम. एच. एल. जे. ७४७ या मा. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिवाडयाचा, **जनार्दन उरकुडा वाघमारे वि. रतनलाल काशिनाथ गुडेकर,** २००७ (६) ऑल एम. आर. ८०० या मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या, **पंकजा आणि इतर वि. यल्लप्पा,** ए. आय. आर. २००४ एस. सी. ४१०२ या मा. सर्वोच्च न्यायालयाच्या, **अनंत तुकाराम पाटील वि. श्रीमती लाला एकनाथ पाटील**, २००४ (४), ऑल एम. आर. या मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या, **एन. टी. पी. सी. लि. वि. रिलायन्स इंडस्ट्रीज**, २००९ (४), ऑल एम. आर. २४ या मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या, **बी. के. एन. पिलाई वि. पी. पिलाई आणि इतर**, ए. आय. आर. २००० एस. सी. ६१४ या मा. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिवाडयाचा आधार घेतलेला आहे.

०३. प्रस्तुतचे अर्जामध्ये व म्हणण्यामध्ये आलेल्या कथनांवरुन या न्यायालयाचे समक्ष खालील मुदद्े उपस्थित झालेले आहेत व त्यावरील निष्कर्ष मी पुढील प्रमाणे नोंदवित आहे.

| क्र. | मुदद्ा | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी यांनी मागितलेली दुरुस्ती पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खरा खुरा प्रश्न निर्णीत करण्यासाठी आवश्यक आहे काय ? | ... होय. |
| २. | अंतिम आदेश काय ? | .. अंतिम आदेशप्रमाणे. |

## का र ण मि मां सा

**<u>मुदद्ा क्र.१</u>**

०४. दुरुस्तीचे अर्जाचा विचार करतेवेळी कार्यवाही कोणत्या टप्यात आहे, मागितलेली दुरुस्ती ही न्याय आहे काय, पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्यासाठी आवश्यक आहे काय या बाबींचा विचार करावा लागतो. तसेच, त्यासंबंधी दिवाणी प्रकिया संहितेमध्ये असलेल्या तरतुदी या देखील पाहाव्या लागतील. **दि. प्र. सं. क्रम ६ नियम १७** अन्वये न्यायालयास कार्यवाही कोणत्याही टप्प्यावर दोहोंपैकी कोणत्याही पक्षकारास, त्याचे वादकथनास, न्याय असेल अशा रितीने व अशा अटींवर फेरबदल करण्याची किंवा सुधारणा करण्याची मुभा देण्यात येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व सुधारणा केल्या पाहिजेत. परंतु, न्याय चौकशी सुरु झाल्यानंतर पक्षकाराने योग्य ती खबरदारी घेवुन सुध्दा न्याय चौकशी सुरु होण्यापुर्वी ती बाब पुढे आणता आली नाही या बाबत न्यायालयाचे समाधान झालेले असल्या खेरीज सुधारण्यासाठीचा अर्ज अनुज्ञेय असणार नाही.

०५. अभिलेख पाहिला असता असे दिसुन येते की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादी याचेविरुध्द कब्जा मिळावा, जाहिर ठराव होवून मिळावा, दि. २३/०२/२०१० रोजीचा खरेदीचा दस्त त्याचेवर बंधनकारक नाही असा जाहिर

ठराव होवून मिळावा व निरंतर ताकीद मनाई हुकूम मिळावा याकरीता दाखल केलेला आहे. मुकदम्याची कार्यवाही अंतिम युक्तिवादकामी ठेवण्यात आली असताना प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आलेला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने न्यायालयाने दावा मिळकत ति—हाईत इसमास विकू नये अथवा तिचेवर बोजा निर्माण करू नये असा स्थगिती आदेश दिलेला असताना मिळकत ति—हाईत इसमास विकलेली आहे. त्यामुळे दाव्याचा गुणावगुणावर निकाल होणेकरीता दुरूस्ती होणे आवश्यक असल्याचे नमूद करणेत आलेले आहे. प्रस्तावित दुरूस्तीमध्ये वादी यांनी नियोजीत प्रतिवादी क्र.३ कुंडलीक चंद्रकांत निकम, नियोजीत प्रतिवादी क्र.४ सौ. आरती अरूण जाधव यांना पक्षकारपणामध्ये सामील करून घेणेत यावे, विषयाची किंमत व दाव्याची आकारणी यामध्ये दुरूस्ती, कलम ५ नंतर पोट कलम ५अ, परिच्छेद क्र.८ नंतर, ९ नंतर ९अ, ९ब, या दुरूस्त्या करण्यास परवानगी मिळावी असे नमूद केलेले आहे. म्हणण्यामध्ये प्रतिवादी यांचे तर्फे प्रामुख्याने सदरच्या दुरूस्तीमुळे दाव्याची आकारणी व दाव्याचा मुद्रांक बदलेल. दावा या न्यायालयाचे कार्यक्षेत्राचे अधिकार कक्षेबाहेर जाईल, या कारणांवरून हरकती उपस्थित करून तो नामंजूर करावा अशी मागणी केलेली आहे. वादी यांचे तर्फे त्यांचे कथनाला पुष्टी मिळावी याकरीता त्यांनी नि.क्र.१९१ च्या वर्णन यादी समवेत खरेदी खताच्या दस्ताची प्रमाणित प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे.

०६. अभिलेख पाहिला असता असे दिसून येते की, प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचे विरूध्द दि.२४/१२/२००९ रोजी दाखल करून त्यामध्ये दि.२३/०२/२०१० रोजीचे खरेदीखताबाबत जाहिर ठरावाची मागणी करणेत आलेली आहे. नि.क्र.४२ वरून या न्यायालयाचे पूर्व पीठासीन अधिकारी यांनी तो अर्ज मंजूर करून दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत दावा मिळकत गहाण, दान, खरेदी, बक्षिस अगर इतर कोणत्याही प्रकारे कोणासही तबदील करू नये अशी तुर्तातुर्त ताकीद प्रतिवादी क्र.२ यास दिलेली आहे. दावा मिळकत ही मौजे खुंटे येथील गट क्र.२४९ ही अचल मिळकत आहे. प्रतिवादी

क्र.२ हा गोविंद शंकरराव जगताप हा असल्याचे दिसून येते. नि.क्र.१९१/१ वरून तो खरेदीचा दस्त दावा मिळकतीचे अनुषंगाने कुंडलीक चंद्रकांत निकम व आरती अरूण जाधव यांचे दरम्यान दि.१९/१०/२०१६ रोजी नोंदणीकृत दस्ताने दुय्यम निबंधक फलटण यांचे कार्यालयात नोंदणी झाल्याचे दिसून येते. यावरून असे दिसून येते की, कथित दस्त हा मुकदम्याची कार्यवाही प्रलंबित असताना व तुर्तातुर्त ताकीद आदेश दिलेले असताना तबदिलीचा व्यवहार झाल्याचे दिसून येते. सदरची बाब अनुषंगीक असल्याचे त्यावरून स्पष्ट होते. वादी यांनी दाव्यात अनेक ठिकाणी दुरूस्त्या मागितलेल्या आहेत. त्यामध्ये दावा दाखल झाल्यानंतर झालेल्या अनुषंगीक दुरूस्त्या याचेबरोबरच दाव्याची किंमत व आकारणी व मागणी यामध्ये दुरूस्ती करून मागितलेल्या आहेत. मालमत्ता हस्तांतरण कायदा कलम ५२ चा विचार करता मालमत्तेसंबंधी दावा प्रलंबित असताना तिचे हस्तांतरण केल्यास याबाबतची तरतूद नमूद करण्यात आलेली आहे. वादी यांनी मागितलेली तबदिलीबाबतची व नियोजीत प्रतिवादी क्र.३ व ४ यांचेबाबतची दुरूस्ती ही निश्चितपणे इतर दुरूस्त्यांबरोबर अनुषंगीक दुरूस्ती आहे. परंतु, जर वादीचा आहे त्या स्वरूपातील पूर्ण अर्ज मंजूर केला गेल्यास मुळ दाव्याचे विषयाची किंमत, दाव्याची आकारणी व विनंती यामध्ये निश्चितच बदल होणार आहेत. वादीचे कथनाप्रमाणे दावा मिळकतीचा कब्जा, कथित नियोजीत प्रतिवादी यांचेकडे अनाधिकाराने हस्तांतरीत झालेला आहे. यावरून जर नियोजीत प्रतिवादी यांना प्रतिवादीपणामध्ये सामील केले गेले नाही तर त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळणार नाही. जर त्यांचे त्या मिळकतीत हक्क, हितसंबंध व अधिकार प्रस्तापित झाले असतील तर त्यांना त्यांची बाजू मांडू देणे नैर्सगिक न्यायतत्वाचा विचार करता आवश्यक व गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.३ व ४ यांना दाव्यामध्ये पक्षकारपणामध्ये सामील करून घेणे व तबदिलीचे व्यवहाराबाबत असलेली दुरूस्ती या मागितल्या गेलेल्या दुरूस्त्या या पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्याकरीता आवश्यक असल्याचे दिसून येते. याउलट जर संपूर्ण अर्ज मंजूर केला गेला तर दाव्याचे मुल्यांकन, विनंती व आकारणी यामध्ये बदल होईल.

कायदयाच्या स्थापित स्थितीचा विचार करता दाव्याच्या मुळ स्वरूपात बदल होणार असेल तर अशा प्रकारच्या दुरूस्त्या मंजूर करता येत नाहीत. तसेच वादी यास मालमत्ता हस्तांतरण कायदा कलम ५२ मध्ये नमूद करण्यात आलेल्या तरतूदीचा विचार करता येईल, किंबहुना त्याची मदतही घेता येईल. म्हणुन **मुदद्ा क्र.१** चा निष्कर्ष मी अंशत: **होकारार्थी** नोंदवित आहे.

**<u>मुदद्ा क्र.२</u>**

०७. वर नमुद उहापोह, विवेचन, कायदेशीर तरतुदी, मा. उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिवाडे, कायदयाची स्थापित स्थिती, मुकदम्याचा असलेला टप्पा व मुदद्ा क्र.१ ला नोंदविला गेलेला अंशत: होकारार्थी निष्कर्ष यांचा विचार करता मुदद्ा क्र.२ चे समर्थनार्थ मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. नि.क्र.१८८ चा दाव्यात सुधारणा करण्याचा / दुरूस्ती करण्याचा अर्ज अंशत: मंजूर करणेत येत आहे.

२. वादी यांना प्रतिवादी क्र.१ व २ यांचे बरोबरच प्रस्तुत अर्जात नमूद असलेले प्रतिवादी क्र.३ कुंडलीक चंद्रकांत निकम, प्रतिवादी क्र.४ आरती अरूण जाधव यांना पक्षकारपणामध्ये सामील करून तशी दुरूस्ती सरनाम्यात करण्यास व दि.०५/०४/२०१६, दि.०५/१०/२०१६ या हस्तांतराबाबत नि.क्र.४६ चा आदेश दिल्यानंतर झालेल्या अनुषंगीक व्यवहारांच्या दुरूस्त्या करण्याबाबत परवानगी देणेत येत आहे.

३. वादी यांनी प्रतिवादी क्र.१ व २ यांना खर्च म्हणून प्रत्येकी र.रू.२००/— दयावेत, असा आदेश देणेत येत आहे.

४. विषयाची किंमत, दाव्याची आकारणी व विनंती कलमामध्ये मागणी करण्यात आलेली दुरूस्ती याबाबतचा अर्ज हा दाव्याचे स्वरूप बदलणार असल्याने ती मागणी नामंजूर करण्यात येत आहे.

५. वादी यांनी परवानगी देणेत आलेल्या दुरूस्त्या विहीत मुदतीमध्ये मुळ दाव्यात कराव्यात, दुरूस्त दाव्याच्या प्रती अभिलेखावर दाखल कराव्यात, मुकदम्याचे वय पाहता त्वरित नियोजीत प्रतिवादी यांना समंस काढावे याकरीता पाउल उचलावे.

६. नियोजीत प्रतिवादी क्र.३ व ४ यांना मंजूर दुरूस्ती अर्जाचे अनुषंगाने व मुळ

दाव्यामध्ये करण्यात आलेल्या कथनांचे अनुषंगाने कैफियत देण्यास, वादी व प्रतिवादी यांना नव्याने करण्यात आलेल्या कथनांबाबत पुरावा देण्यास परवागनी देणेत येत आहे.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषीत)

(सु.बा. तोडकर)
दिवाणी न्यायाधीश क—स्तर,
फलटण, जिल्हा — सातारा.

ठिकाण : फलटण
दिनांक: ०७.०३.२०१७